नवराष्ट्र

# सेवाग्राम येथे चार दिवसीय कार्यशाळेचे उद्‌घाटन

**वर्धा,** ब्युरो. राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच आचार्य विनोबा भावे यांच्या पावन स्पर्शाने पुनित झालेल्या भूमीत महत्वपूर्ण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याबद्दल आपले आभार मानतो. शेतकऱ्यांच्या हितासाठी जलस्त्रोत विकास तसेच व्यवस्थापनावर काम करणे अत्यंत आवश्यक आहे. असे प्रतिपादन आमदार पंकज भोयर यांनी केले. ते बजाज फाउंडेशन, विश्व युवक केंद्राच्या संयुक्त विद्यमाने सेवाग्राम येथे आयोजित 4 दिवसीय 'कृषी उद्योजकता तथा जलसंपत्ती व्यवस्थापन' कार्यशाळेच्या उद्‌घाटनाप्रसंगी बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, विश्व युवक केंद्राचे के सी. ई. ओ. उदय शंकर सिंग, जलतज्ज्ञ माधव कोटस्थानेसह बजाज फाउडेशनचे अध्यक्ष (सीएसआर) हरी मोरी, प्रादेशिक कार्यक्रम व्यवस्थापक महेंद्र फाटे यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी कर्डिले यांनी पाण्याची साठवणूक करण्यासाठी प्रयत्नाची गरज असल्याचे सांगत या कार्यशाळेची प्रशंसा केली. जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने यांनी जलस्त्रोतांचा विकास करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोण आवश्यक असल्याचे सांगितले. तामसवाडा प्रकल्पाची यावेळी माहिती देण्यात आली. वॉटर रिसोर्स मॅनेजमेंट डेव्हलपमेंट विषयी त्यांनी मार्गदर्शन केले. हरी मोरी यांनी शेतकऱ्यांकडे असलेली अल्प जमीन ही शेतकऱ्यांची समस्या नसून पेरणी पद्धतीत बदल करण्याची आवश्यक्ता असल्याचे सांगितले.




## 15 राज्यातील 100 सदस्य सहभागी

बजाज फाउंडेशन तथा विश्व युवक केंद्राच्यावतीने आयोजित या चार दिवसीय या कार्यशाळेसाठी देशातील 15 राज्यातून 100 एनजीओच्या सदस्यांनी सहभाग घेतला आहे. कार्यशाळेत सिद्धांतिक तसेच व्यावहारिक अशा दोन्ही घटनांचा समावेश आहे. प्रशिक्षण कक्षात जे शिकविले त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.